# RURAL SOCIETY
## PAST, PRESENT AND FUTURE
### (ग्रामीण समाज : काल, आज व उद्या)



Prin. Dr. Sambhaji Desai







# INDEX

1. Role of Rural Economy in India's Development ........ 1
Stafano Burnoi, Italy

2. Rural Life in Germany ........ 3
Sandip Chavan, Freiburg, Germany

3. Features of Rural Society ........ 4
Kjell Gulbrandsen, Norway

# PAST

## Rural Tradition (ग्रामीण परंपरा)

4. Customs and Traditions of Rural Muslim Community: A Study ........ 7
Vaqar R.Shaikh

5. मध्ययुगीन महाराष्ट्रातील ग्रामीण समाज रचना ........ 9
डॉ. सुलोचना अ. पाटील

6. महाराष्ट्रातील बलुतेदार पध्दत ........ 12
प्रा. चित्रा सुकदेव पाटील

7. धनगर जमातीतील रुढी परंपरांचा अभ्यास ........ 16
प्रा. धनगर जगतराव उत्तम

8. ग्रामीण समाजातील कुलविषयक ऐतिहासिक परंपरा ........ 18
प्रा. जे. डी. गोपाळ

9. ग्रामीण समाज ........ २१
प्रा. माया शिंदे

10. भारतीय ग्रामीण समाजव्यवस्थेतील परंपरा व परिवर्तन ........ 23
प्रा. किशोर व्ही. सोनवणे

## Rural Education (ग्रामीण शिक्षण)

11. Distance Education: A Face for Enhancing Educationally Empowerment of Rural Women ........ 28
Jagtap Manisha V.

12. ग्रामीण प्राथमिक शिक्षण : एक दृष्टिक्षेप ........ 31
प्रा.डॉ.डी.के.कदम

13. ग्रामीण भागातील आदिवासी मन्नेरवारलु जमातीची शैक्षणिक स्थिती ........ 35
प्रा. डॉ. जिरेवाड लक्ष्मीकांत मारोतीराव

# ग्रामीण प्राथमिक शिक्षण : एक दृष्टिक्षेप

**प्रा.डॉ.डी.के.कदम**
हुतात्मा जयवंतराव पाटील
महाविद्यालय, हिमायतनगर

---

ज्या देशातील मानवी संपत्ती सुजान, सुसंस्कृत, सौजन्यशील आणि सुदृढ असते तो देश श्रीमंत मानला जातो. शिक्षणाने मानवाच्या अंगी गुण विकसीत होऊ शकतात. व्यक्तिगत जीवनात विद्या हेच माणसाचे भूषण आहे. मानवी जीवनाची मूहूर्तमेढ शिक्षणानेच रोवली जाते. मानवी जीवनात शिक्षणाला अतिशय महत्वाचे स्थान असून शिक्षणाशिवाय मानवाचा विकास होऊ शकत नाही. शिक्षण ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत मनुष्य सातत्याने अखंडपणे कोणत्या ना कोणत्या माध्यमातून शिकतच असतो. कोणत्याही समाजाच्या विकासासाठी शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे.

प्राचीन काळापासून गुरुकुल पध्दती ही विद्यार्थ्यांना सर्वंकष व गुणवत्तापूर्ण ज्ञान देणारी आदर्श व्यवस्था होती. भारतीय संस्कृतीने गुरुचे महत्त्व सदैव गायिले आहे. गुरुगृही रम्य, उदात्त, निर्मळ वातावरणात विद्येची उपासना चालत असे. स्फूर्तिदायक वातावरण, थोर चारित्र संपन्न आचार्यांचा सहवास, पोषक आहार व विहार यामुळे गुरुकुल ही विद्येच्या आराधनेची आदर्श स्थाने होती. गुरुकुल पध्दतीमध्ये चारित्र्य संवर्धनावर जास्त भर दिला जात होता. काळाबरोबर गुरुकुलाची संकल्पना अस्तंगत होत गेली. शिक्षणातून मुलभूत मानवी गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व कौशल्याचा विकास करणे हे ध्येय मानले गेले. शिक्षण हे रोजगार उपलब्ध करुन देणारे साधन बनत चालले आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मानवी मुलभूत गरजांची पूर्ती करणारे साधन म्हणून शिक्षणाकडे पाहण्याची पध्दत दिवसेंदिवस वाढत आहे. आजपर्यंत जे ज्ञान प्रसंगोत्पात सहजासहजी दिले जाई ते सहेतूकपणे व तंत्रशुध्द पध्दतीने देण्यास सुरुवात करण्याची आवश्यकता भासू लागली आहे. शिक्षणाची प्रक्रिया गतिमान व्हावी, शिक्षणाचे सर्वांगीकरण व्हावे या उद्देशाने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शिक्षणाच्या संदर्भात अनेक आयोग व समित्या स्थापन केल्या. त्यात राधाकृष्णन आयोग १९४८, मुदलीयार आयोग १९५२, कोठारी आयोग १९६४, राष्ट्रीय धोरण १९६८, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६, Implementation of New Education Policy 1992, १९९२, बिर्ला-अंबानी समिती २००२, यशपाल समिती २००५, Knowledge Commission 2006, UGC Review Committee २००६, RTE - २००४ तर २०१० मध्ये ने ६ ते १४ वयोगटातील मुलांसाठी प्राथमिक शिक्षण सक्तीचे बनवण्यात आले. ग्रामीण भागातील शिक्षणाची स्थिती अतिशय विदारक स्वरुपाची आहे. प्रस्तुत शोध निबंधात ग्रामीण प्राथमिक शिक्षण एक दृष्टिक्षेप या विषयावर सखोल अध्ययन केले.

## अध्ययनाची उद्दिष्टे :-

१) ग्रामीण भागातील शिक्षणाचा आढावा घेणे.
२) ग्रामीण भागातील शिक्षक व विद्यार्थ्यांचे परस्पर संबंध अभ्यासणे.
३) ग्रामीण भागातील शाळा, भौतिक सुविधा यांचा अभ्यास करणे.
४) इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची पालकांची मानसिकता अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत विषयाच्या अध्ययनासाठी प्राथमिक व व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब केला आहे. प्राथमिक तथ्य संकलनात मुलाखत आणि निरीक्षण या तंत्राचा अवलंब केला आहे. व्दितीय तथ्य संकलन पध्दतीचा अवलंब केला आहे. पुस्तके, अहवाल, वर्तमानपत्रे यांचा उपयोग केला आहे.

**तथ्याचे विश्लेषण :-**

ग्रामीण भागात शिक्षणाच्या प्रक्रियेचा प्रसार व प्रचार होण्यासाठी शासनाने सार्वजनिक प्राथमिक शिक्षणाची तरतूद हा भारताच्या राष्ट्रीय शिक्षण पध्दतीतील एक अविभाज्य घटक मानण्यात आलेला. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाच्या सोयीमध्ये बरीच वाढ केलेली दिसते. शिक्षण विषयक कायदयात सुधारणा करुन ६ ते १४ वर्षे वयोगटातील मुलांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. त्यामुळे नांदेड जिल्हयातील काही गावात एकापेक्षा जास्त प्राथमिक शाळा आहेत. पूर्ण प्राथमिक शाळांना उच्च प्राथमिक वर्ग जोडले आहेत.

महाराष्ट्र राज्य शासनाने सुरु केलेली सर्व शिक्षा अभियान मोहीम फलदायी ठरली आहे. याचे फलस्वरुप असे की, किमान २०० इतकी लोकसंख्या असलेल्या वस्तीसाठी १.५ कि.मी.परिसरात प्राथमिक शाळा सुरु झाल्या. त्यामुळे दुर्गम, डोंगराळ भाग, वाडया, वस्त्या, तांडे अशा ठिकाणी शिक्षण पोहचल्याचे चित्र पहावयाला मिळते.

आजही ग्रामीण भागातील शाळेत पिण्याच्या पाण्याची सोय नाही, खेळाचे मैदान नाही. शासनाकडून जे खेळाचे साहित्य मिळाले ते धुळीने माखले आहे. ज्या ठिकाणी शासनाने शौचालयाची व्यवस्था केली त्या ठिकाणच्या शौचालयाचा पाण्याअभावी उपयोग होत नसल्याचे दिसून आले. एवढेच नव्हे तर अनेक शाळेच्या शौचालयावर वेली वाढल्याचे दिसून आले. आजही ग्रामीण भागातील शाळांना शासनाने अनुदान दिले आहे, परंतू ग्रामीण भागातील शाळेत भौतिक सुविधांचा अभाव आहे कारण संगणकीय शिक्षण देण्यासाठी शासनाने प्रत्येक शाळेत संगणक दिले परंतू ते संगणक धुळखात पडल्याचे दिसून आले आहे. नांदेड जिल्हयातील हिमायतनगर तालुक्यात मानव विकास मिशन अंतर्गत शाळेला संगणकीय शिक्षण देण्यासाठी शाळेला जे संगणक दिले आहे प्रत्यक्ष निरीक्षणात असे दिसून आले की, त्या संगणकाचा कुठल्याही प्रकारे वापर होत नाही त्या शाळेतील संगणकावर धुळ साचलेली दिसून आली. शासनाकडून खेळाचे साहित्य मिळाले परंतू खेळाचे मैदान नसल्यामुळे खेळाचे साहित्य धुळखात पडले आहे. ज्या ठिकाणी शासनाने शौचालयाची व्यवस्था केली त्या ठिकाणी शौचालयाचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून ते एक ते दोन वर्षात पडल्याचे दिसून आले नाही. काही शौचालयावर वेली वाढल्या आहेत. ज्या ठिकाणी शौचालय आहे त्या ठिकाणी पाण्याच्या अभावी शौचालयाचा वापर होत नाही. शाळेत पिण्याच्या पाण्याची सुविधा नाही. सोलापूर जिल्हयातील मंगळवेढा तालुक्यातील एका शाळेतील मुलगा शाळेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे शेतातील विहीरीत पाणी पिण्यासाठी जाऊन मृत्यूमुखी पडला ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे.

शिक्षणाच्या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. शिक्षक हा परिवर्तनाचा आधारस्तंभ आहे. शिक्षक हा एक निर्माता आहे. कारण एक अभियंता एक इमारत निर्माण करु शकतो परंतु शिक्षक हा संस्कृती निर्माण करतो. शिक्षकांच्या कर्तत्वावरच शिक्षणाची गुणवत्ता अवलंबून असते. परंतु ग्रामीण भागात शिक्षक निवासी राहण्यास तयार नाही. प्रत्यक्ष असे दिसून आले ज्या खेडेगावात शिक्षक ज्ञानार्जनाचे कार्य करतो त्या शाळेत आपल्या स्वतःच्या पाल्याला ठेवतांना दिसून येत नाही. तो शिक्षक चांगली शाळा या नावाखाली आपल्या स्वतःचे मुले शहरी भागातील शाळेत शिक्षणासाठी ठेवून ते येणे-जाणे (अप-डाऊन) करतांना दिसून येतात. त्यामुळे शिक्षकांची मानसिकता स्थिर स्वरुपाची राहू शकत नाही. आज शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे संबंध घनिष्ट स्वरुपाचे न बनता कामापुरते बनताना दिसून येतात हे चित्र आज सर्वत्र पाहावयास मिळते. महात्मा गांधीजी यांच्या मते ''शिक्षण म्हणजे मनुष्यात जे सर्वोत्कृष्ट आहे

ते बाहेर प्रगट होऊ देणे होय." म्हणजेच प्रत्येक मनुष्यात काही ना काही सर्वोत्कृष्ट गुण असतात. परंतु ते गुण बाहेर प्रगट करण्याची संधी मिळावी हेच महात्मा गांधींना अभिप्रेत होते. विद्यार्थ्यांतील सर्वोत्कृष्ट गुण बाहेर प्रगट होण्याच्या प्रक्रियेत शिक्षकांची भूमिका महत्वाची असते. आजच्या शिक्षण पध्दतीनुसार शिक्षण फक्त परीक्षार्थी झालेले आहेत. शिक्षणात फक्त परीक्षेवर भर असून प्रयोगशिलतेला फार कमी वाव आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्त गुणांना विकसित करण्यासाठी त्यांना संधीच मिळत नाही. परीक्षार्थी दडपणामुळे त्यांच्यातील सुप्त गुणांचे दमन होत आहे. त्यामुळे विकृत भावना निर्माण होऊन दहशत, वाद, भ्रष्टाचार, अत्याचार, शोषण, अनिती इत्यादी दोषांना उजाळा मिळत आहे.

विद्यार्थ्यांच्या आवडीप्रमाणे त्यांच्या प्रयोगशीलतेस शिक्षकांच्या निरीक्षणाखाली वाव दिल्यास त्यांच्यातील गुण विकसित होण्यास मदत होईल. परंतु आज ग्रामीण भागातील शाळा, महाविद्यालयातील शिक्षक निवासस्थानी न राहता तो शहराच्या ठिकाणाहून अप-डाऊन करत आहे. नांदेड जिल्हयातील अप-डाऊन करणाऱ्या कर्मचारी व शिक्षकांचे घरभाडे बंद करण्याचे आदेश जिल्हा परिषद नांदेडचे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. ज्या गावी शिक्षक कार्यरत आहे त्या ठिकाणी वास्तव्य करुन राहिल्यास शिक्षणाची प्रक्रिया आणखी प्रभावी ठरु शकते. लहान मुलांवर शिक्षकांचा प्रभाव हा आई-वडीलांपेक्षा जास्त पडतो. शिक्षक त्या गावात राहील्यास त्या गल्लीत/परिसरात राहणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिक्षकांचा प्रभाव पडतो. ग्रामीण भागात शिक्षक राहिल्यास त्यांच्या पगारीचा पैसा काही प्रमाणात का होईना खेडयात राहतो. त्या शिक्षकांच्या कुटुंबाला लागणाऱ्या जीवनावश्यक वस्तू त्या खेडयात खरेदी करु शकेल. त्यामुळे ग्रामीण भागातील पैसा हा ग्रामीण भागात राहील. कारण एका गावात चार शिक्षक राहील्यास त्यांच्या कुटूंवास लागणाऱ्या वस्तूंचा विचार करुन चालणार नाही तर ग्रामीण भागातील सर्व शाळेतील शिक्षक ग्रामीण भागात राहीले तर खरोखर ग्रामीण विकासाला हातभार लागेल.

आज शिक्षण क्षेत्राचे व्यापारीकरण होऊ लागले आहे. व्यापारीकरणातून बाजारीकरणाकडे या दिशेने शिक्षणाची वाटचाल हाऊ लागली आहे. सरकारच्या खाजगीकरणाच्या आणि स्पर्धेला मुक्त वाव देण्याच्या धोरणाने शिक्षणाचे झपाटयाने खाजगीकरण होऊ लागले आहे. आर्थिक सामर्थ्याच्या जोरावर शिक्षण संस्था स्थापन करणाऱ्या आणि त्यांच्या माध्यमातून अमाप पैसा जमा करणाऱ्या शिक्षण सम्राटाचे ग्रामीण भागापर्यंत लोण पोहचले आहे. शिक्षणसंस्था चालकांना कोणत्याही प्रकारचा ध्येयवाद, शिक्षण नाही. नितीमुल्यांची जाणीव नाही. आपल्या हाती असलेल्या शिक्षणसंस्थाच्या माध्यमातून जास्तीतजास्त संपत्ती जमविण्याचा एकमेव उद्देशाने ते शिक्षण क्षेत्राकडे ते वळले आहेत.

प्रत्येक पालकांची आज मानसिकता आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिक्षण दयावे अशी मानसिकता बनल्यामुळे ते खेडयात इंग्रजी शाळा स्थापन झाल्या आहेत. परंतु इंग्रजी शाळांची स्थिती अतिशय वाईट आहे. लहान मुलांना प्रशिक्षीत शिक्षकांचा अभाव, खेळाचे मैदान नाही, छोटया छोटया खोल्यात मर्यादेपेक्षा जास्त विद्यार्थी बसल्यामुळे अध्ययन अध्यापनात अडचणी निर्माण होतात. इंग्रजी माध्यमाच्या शाळा आहेत त्या व्यवस्थापन प्रमुखाकडे उच्चशिक्षणाचा अभाव, भांडवलदाराची, व्यापाऱ्यांची मुले शाळेचे व्यवस्थापन करतांना दिसून आले. इंग्रजी माध्यमातून पाल्यांना शिक्षण देणे हे पालकांची प्रतिष्ठा बनली आहे. त्यामुळे मराठी शाळा ओस पाडून इंग्रजी शाळांमध्ये प्रवेश दिल्या जात आहे. व्यक्तीच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये इंग्रजी, मराठी हा विषय महत्वाचा नसून त्या देण्यात येणारे शिक्षण कशा पध्दतीचे आहे यावर त्यांची यशस्वीता अवलंबून असते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सारख्या विद्वानांनी आपले शिक्षण मराठी माध्यमातून पूर्ण करुन इंग्रजी सारख्या विषयावर चांगले प्रभुत्व मिळवले. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या केळकर समितीच्या अहवालात असे नमुद केले आहे इंग्रजी शिक्षण हे मुलांना चौथ्या वर्गापासून देण्यात यावे अशी शिफारस केली आहे. त्यामुळे आपल्या शिक्षण पध्दतीमध्ये शैक्षणिक विसंगती दिसून येते.

मानवी जीवनात मुल्य हे दिपस्तंभाप्रमाणे असतात. मुल्याप्रमाणे जगले तर जीवनात सुख समाधान मिळते. हे मानवी मुल्य शिक्षणाच्या माध्यमातून प्राप्त होतात. शिक्षणामुळे माणसात न्याय, नैतिकता, सत्य, सदाचार, बंधूभाव,

प्रेम, सहकार्य, राष्ट्रवाद, नितीमत्ता, प्रामाणिकता, चारित्र्य संपन्न नागरिक घडविण्याचे काम शिक्षण करते. हल्लीच्या शिक्षण व्यवस्थेमध्ये मुल्यशिक्षणाकडे दुर्लक्ष होत आहे. शरीर, ह्रदय व बुध्दी यामध्ये सुसंवाद स्थापन न झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात मानव हा मानवच राहीला. मनुष्य बनू शकला नाही असे चित्र सर्वत्र पाहावयाला मिळत आहे. त्यामुळे सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणात मुल्यशिक्षणावरही भर देण्यात आला. विद्यार्थ्यांना सामाजिक मुल्ये आणि आपल्या देशाचा महान सांस्कृतिक वारसा यांची माहिती करुन देणे आणि त्यांची सामाजिक जाणिव प्रगल्भ बनविणे हा मुल्य शिक्षणाचा प्रमुख उद्देश आहे. म्हणून मुल्यशिक्षणावर जास्तीत जास्त भर देणे गरजेचे आहे.

प्राथमिक शिक्षणापुढील शिक्षणाचा मूलाधार असतो. प्राथमिक शिक्षण मुलांचे भवितव्य घडविण्याचे महत्त्वाचे कार्य करीत असते. त्यामुळे महात्मा गांधींनी महत्वाच्या प्राथमिक शिक्षणाकडे विशेष लक्ष केंद्रित केले होते. महात्मा गांधींनी प्राथमिक शिक्षणाचे महत्व स्पष्ट करतांना म्हटले की, प्राथमिक शिक्षण नि:शुल्क व सक्तीचे करावे. प्राथमिक शिक्षणाची सुरुवात मूळाक्षरांनी न करता हस्तकौशल्याचा शिक्षणाने करावी. हस्तकौशल्य हा फक्त माणसातील विशेष गुण आहे.

हस्तोद्योग व गृहोद्योगांना भेटी देऊन विद्यार्थ्यांना ते कसे हाताळतात त्या बाबतची संपूर्ण माहिती व त्यांचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांच्या मनाला विचार करण्याचा, हाताला काम करण्याचा व डोळयांना निरीक्षण करण्याचा सराव होईल. ऐतिहासिक बस्तूंच्या सानिध्यात नेऊनच विद्यार्थ्यांना इतिहास शिकवावा तर सभोवतालचा भूगोल व भौगोलिक ठिकाणाबर नेऊनच शिकवावा तरच विद्यार्थ्यामध्ये त्या विषयाची आकर्षण व गोडी निर्माण होईल. परंतू प्रत्यक्ष शाळेत विद्यार्थ्यांना भेट घेऊन कार्य शिक्षण या विषयी मुलाखती घेतल्या त्यावेळी त्या विद्यार्थ्यांना कार्यशिक्षण विषया विषयी जाणीव नसल्याचे दिसून आले. कारण कार्यशिक्षण हा विषय आठ दिवसातून शाळेत एक तास शिकविला जातो. तसेच त्या तासिकेत शिक्षक इतर विषय शिकवित असल्याचे आढळून आले. त्या विषया संबंधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठा निर्माण होत नाही म्हणून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना कार्य शिक्षण हा विषय काटेकोरपणे शिकवावा तसेच इतर इंग्रजी, गणित व मराठी इत्यादी विषयाप्रमाणेच कार्यशिक्षण हा विषय शिकविण्यासाठी कायमस्वरुपी शिक्षकाची नेमणुक करावी. तरच विद्यार्थ्यांना उद्योगप्रधान बनवण्यास मदत होईल.

**समारोप :-**

सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून शिक्षणाचे सार्वत्रीकरण झाले असले तरी ग्रामीण भागातील शाळांमध्ये शैक्षणिक भौतिक सोयी सुविधा यांची अभाव दिसून येतो. ग्रामीण भागातील गुणवत्ता पूर्ण शिक्षण उपलबध करुन न देण्यासाठी भौतिक सोयी-सुविधा निर्माण करणे शासनाची जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील शिक्षक निवासी राहण्यासाठी बंधनकारक केले पाहीजे. त्यामुळे विद्यार्थी व शिक्षक यांचे घनिष्ट संबंध निर्माण होतील. त्याच बरोबर मराठी माध्यमाच्या शाळा महत्वाच्या आहेत. ग्रामीण भागातील पालकांना महत्व समजावून सांगीतले पाहीजे. प्रत्येक शाळेवर संगणकीय शिक्षण देण्यासाठी एका संगणकाचे ज्ञान असलेल्या शिक्षकाची कायमस्वरुपी नेमणुक करावी. महाराष्ट्र शासनाने मराठी माध्यमांच्या शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रभावी प्रयत्न केले पाहीजे. ग्रामीण भागात ज्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा वाढत आहेत त्यावर शासनाने नियंत्रण ठेवून गुणवत्ता राखण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळांसाठी नविन कायदा केला पाहिजे.

**संदर्भग्रंथ :-**

१) ग.वि.अकोलकर व गं.श.डोंगरे, शिक्षणाचा अर्थ व प्रयोजन, विद्या प्रकाशन, शनिवार पेठ, पुणे - १९७३.

२) व.रा.नागपूरे, शैक्षणिक आव्हानाकडून कृतिकार्यक्रमाकडे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०, १९८७

३) दैनिक लोकमत नांदेड जिल्हा, डिसेंबर - २०१४

४) धर्माधिकारी भारु (सं.), ग्राम स्वराज्य महाराष्ट्र गांधी स्मारक निधी प्रकाशन पुणे.

५) प्रा.व्ही.वी.पाटील 'मानवी हक्क' के.सागर पब्लीकेशन - पुणे.